(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. IX / Issue – I ISSN 2277-8063

# राजर्षी शाहू महाराजांची सामाजिक न्यायाची भूमिका

प्रा.उदयकुमार नारायण लाड
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
श्रीपतराव चौगुले आर्टस् अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज,
माळवाडी–कोतोली ता.पन्हाळा, जि. कोल्हापूर

डॉ. एस. बी. फड
विभागप्रमुख राज्यशास्त्र विभाग
नेताजी सुभाषचंद्र कॉलेज, नांदेड.

**प्रस्तावना**

आधुनिक महाराष्ट्राचा इतिहासात आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करुन त्यांची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू छत्रपती शाहू महाराज होत. विचारपूर्वक स्वीकारलेल्या सामाजिक किंवा राजकीय न्यायतत्त्वांच्या बाबतीत कोणतीही तडजोड न स्वीकारता, या तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले असामान्य मानसिक धैर्य छत्रपती शाहू महाराजांजवळ होते. त्यांच्या कार्यामुळेच त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरतेच मर्यादित न राहता, अखिल महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही लोकप्रिय झाले. एक आदर्श राजा, बहुजन समाजाचा नेता म्हणून असलेली त्यांची लोकप्रियता शेवटपर्यंत कायम टिकली. या काळात महाराष्ट्रात उच्च मानल्या गेलेल्या जातीने आपले सर्वांगीण वर्चस्व निर्माण केले होते व हे वर्चस्व टिकविण्यासाठी बहुजन समाजावर निरनिराळी सामाजिक व धार्मिक बंधने लादलेली होती. या बंधनांतून बहुजन समाजाची सुटका करुन, त्याला सुशिक्षित बनविण्याचे, जागृत करण्याचे व प्रगत बनविण्याचे कार्य छत्रपती शाहू महाराजांनी केले. आपल्या या कार्याविषयी होणारी प्रचंड टीका त्यांनी निर्भयपणे सहन केली. पण आपल्या ध्येयधोरणात व कार्यपध्दतीत बदल केला नाही. त्यांच्या या कार्यामुळेच असामान्य व्यक्तिमत्त्वाचा, बहुजन समाजाचा लोकनेता म्हणून त्यांना लोकप्रियता मिळाली.

**शाहू महाराजांचे सामाजिक न्यायाचे तत्त्व**

स्वातंत्र्यपुर्वकाळात भारतातील अनेक संस्थानिकांनी, राजांनी सामाजिक सुधारणांचा प्रयत्न केला हे खरे आहे. पण, समाजक्रांतीनतर काय? शेवटचा टप्पा, शेवटचे स्टेशन कोणते? ते गाठायचे कसे? प्रवास कसा करायचा हे स्वप्न शाहू महाराजांनी पाहिले आणि या स्वप्नाचे नाव होते सामाजिक न्याय!शाहू महाराजांनी घडवून आणलेल्या साऱ्या सामाजिक, शैक्षणिक सुधारणा सामाजिक न्यायाशी नाते सांगणाऱ्या होत्या, त्याकडे एक पाऊल टाकणाऱ्या होत्या. महाराज केवळ सुधारणावादी नव्हते. तर या सर्व सुधारणांच्या माध्यमातून त्यांना कठीण वाटणारे, व्यवस्थेने रोखून ठेवलेले सामाजिक न्यायाचे तत्त्व त्यांना साकारायचे होते. ते स्वतः युरोपचा दौरा करुन आले होते. भारतातील सामाजिक न्यायाच्या कल्पना, नागरिकांच्या समग्र विकासाच्या कल्पना त्यांच्या कानांवर आणि डोळयांवर आल्या होत्या. त्यांच्या स्वतःच्या कल्पनाही समाजाच्या आकलनातून आणि अर्थातच माणसांच्या आकलनातून जन्माला आल्या होत्या. पर्यावरणातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक विषमता आणि तिचे परिणाम पाहून विषमतामुक्त, बंधमुक्त माणूस आणि समाज जन्माला घालण्याचे स्वप्न त्यांच्या डोळयांसमोर उभे होते.

महात्मा फुल्यांची परंपराही त्यांना खुणावत होती. विशेष म्हणजे प्रजा सुखी ठेवण्याची प्रतिज्ञा त्यांनी राज्यरोहणाच्या प्रसंगीच घेतली होती. प्रजेला नुसतेच विकसित करायचे नव्हते, तर या विकासाचाही विकास म्हणजे केवळ भौतिक विकास नव्हे, तर सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, मानवीय आदींचा विकास करायचा होता. सामाजिक न्यायाचे तत्त्व वापरायचे होते आणि एकएक पाऊल पुढे टाकायचे होते.

असमानांना समानतेने वागवणे म्हणजे न्याय आणि तो व्यापक प्रमाणात विकसित करणे म्हणजे सामाजिक न्याय. माणसाने तयार केलेली विषमता मोडून काढणे, अत्यावश्यक, जीवनावश्यक गोष्टींचे योग्य वाटप करणे, ही सामग्री म्हणजे केवळ अन्न, वस्त्र, निवारा नव्हे, तर ज्ञान, दर्जा, समानता वगैरे; अस्पृश्यांना वेगवेगळया मार्गांनी आत्मसन्मानाची जाणीव करुन देणे, त्यांच्यातला गुलाम संपवून मुक्त माणूस जागा करणे, परंपरेने चालत आलेला आणि धर्ममान्य व समाजमान्य झालेला अन्याय संपवणे, आदर्श समाजव्यवस्थेसाठी प्रयत्न करणे, भेदाभेद न करता समाजातील सर्वांना विकासाची संधी प्राप्त करुन देणे आदी गोष्टींतून सामाजिक न्यायाची एक समग्र कल्पना जन्माला येत असते. (पवार जयसिंगराव,(२०१९):१३७४,१३७५) त्यावेळचे अनेक संस्थानिक, राजे गरिबांची,

अस्पृश्यांची पिळवणूक करुन, तिजोरी भरुन, ऐषआरामी जीवन जगत होते आणि इकडे करवीर संस्थानात स्वत:च्या सुखाची, आरामाची, तिजोरीची, प्रतिष्ठेची पिळवणूक करुन बिनचेहरेवाल्यांना सामाजिक न्याय द्यायचा होता. माणसासाठीच्या क्रांतीचा बिगूल वाजवायचा होता.अस्पृश्यता हा आमच्या आत्म्यावरील कलंक आहे, असे डॉ. बाबासाहेब म्हणाले होते. हा कलंक पुसण्यासाठी शाहू महाराजांनी अनेक कायदे केले. जाहिरनामे काढले. या प्रयत्नांना कृतीची जोड मिळावी म्हणून अनेक ठिकाणी त्यांनी अस्पृश्यांबरोबर भोजन केले. मराठा—धनगर असा विवाह स्वत:च्या कुटुंबात तर घडवलाच; शिवाय अशा विवाहांचे, आंदोलनांचे मोहिमेत रुपांतर करण्याचा प्रयत्न केला. राजवाडयात, प्रशासनात जाहीर समारंभात अस्पृश्यांचा वावर वाढवला. शिरोळ येथे राजघराण्यातील सर्वांनी महारांच्या तक्क्यांत म्हणजे समाजमंदिरात अस्पृश्यांबरोबर भोजन घेतले. अस्पृश्यांच्या विकासात पहिला अडसर होता तो म्हणजे त्यांची जात, उतरंडीच्या सर्वांत तळात ती होती. सर्वांचे ओझे वाहणाऱ्या या जातींना कसलीही प्रतिष्ठा नव्हती.

सर्वप्रथम महाराजांनी गुन्हेगार जातींची हजेरी बंद केली. पारधी, बेरड वडार आदी अनेक जातींना ब्रिटिशांनी कायदा करुन जन्मजात गुन्हेगार ठरवले होते. सरसकट सर्वांना रोज पोलिस पाटलासमोर जाऊन हजेरी द्यावी लागत असे. काही झाले तरी हजेरी चुकत नसे. विशेष म्हणजे कोणतेही गुन्हे कधीही न केलेल्या माणसांनाही हजेरी सक्तीची होती. कारण, ते गुन्हेगारी जातीत जन्माला आले होते. २७ जुलै १९१८ ला एक जाहीरनामा काढून महाराजांनी केवळ हजेरीच बंद केली नाही तर यापैकी काही जातींचे पध्दतशीर पुनर्वसन केले. भाकरीच्या तुकडयासाठी त्यांना फिरावे लागू नये, भीक मागावी लागू नये, आत्मसन्मान गहाण टाकावा लागू नये म्हणून काहींना नोकऱ्या दिल्या. अगदी राणीच्या सेवेकऱ्यांमध्येही हे लोक नोकरदार म्हणून सहभागी झाले. प्रतिष्ठेचे जीवन ही सुध्दा सामाजिक न्यायातील एक महत्त्वाची बाब असते. महाराजांनी तिला पध्दतशीर हात घातला. सर्वप्रथम गुन्हेगारीतून मुक्तता, मग स्थैर्य व पुनर्वसन, मग प्रतिष्ठेचा रोजगार, मग राजकारणात आणि शिक्षणातही त्यांचा प्रवेश असे क्रमाक्रमाने सामाजिक न्यायाच्या शिडीवर एकएक पाऊल टाकले जात होते. नुसताच हजेरी बंदचा कायदा केला असता तर हजेरीतून सुटका झाली असती; पण त्यातून सामाजिक न्याय उगवला नसता. सन्मानाने जगण्याचा प्रश्न सुटला नसता.

समाजात अस्पृश्य ठरलेल्या मग नोकऱ्यातही अस्पृश्य ठरतो. सामाजिक न्याय, आत्मसन्मान, प्रतिष्ठा नाकारली जाते. महाराजांनी महसूल खात्यासाठी एक जाहीरनामा काढला आणि कार्यालयातील अस्पृश्य नोकराशी प्रेमाने, समतेने नाकारणाऱ्या अधिकाऱ्यांनी नोकऱ्या सोडल्या पाहिजेत, असे सांगितले. प्रत्येक माणसाला पशूप्रमाणे नव्हे तर माणसाप्रमाणे वागवा, असा हा जाहीरनामा सांगत होता. महाराजांनी आणखी एक पाऊल पुढे टाकले. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळू नये, असा ६ सप्टेंबर १९१९ तो जाहीरनामा होता. महाराज केवळ कायदेबहाद्दूर नव्हते तर कायदा घेऊन कुठे आणि कसे जायचे, हे त्यांना ठाऊक होते. ते ठिकाण गाठण्यासाठी टप्प्याटप्प्याने ते पावले टाकत होते. सर्व शासकीय खात्यांत अस्पृश्यांना नोकरी दिली पाहिजे आणि तत्पूर्वीच मंजूर झालेल्या आरक्षण कायद्याची अंमलबजावणीही केली पाहिजे, या हेतुने अनेक महत्वाच्या खात्यांत अस्पृश्यांचा शिरकाव केला गेला. अल्पावधीत अस्पृश्य समाज वकील, कोचमन, तलाठी, हुलस्वार, शिलाईकार, जमादार, पोस्टिलियन अशा वेगवेगळया पदांवर दिसू लागला.

महाराज केवळ सुधारणावादी नव्हते, तर सामाजिक न्यायाचे महान प्रणेते, महान पाठीराखेही होते. ज्या गावाने अस्पृश्यांना गुलाम केले होते, अशा काही गावांत अस्पृश्य तलाठी बनून गेला. खऱ्या अर्थाने गावाचा कारभारी झाला. अस्पृश्यांसाठी तलाठयांच्या जागा नुसत्याच जाहीर केल्या गेल्या नाहीत, तर तेथे जाण्यासाठी आवश्यक पात्रता तयार करुन घेतली. या पदाच्या परीक्षेत अस्पृश्य उत्तीर्ण व्हावेत, यासाठी त्यांना शिकवण्या, शिष्यवृत्त्या देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढवला. तलाठीपद विशिष्ट जातीतून खुले केले.सामाजिक न्याय कायदा करुन किंवा सरकारी खात्याला तसे नाव देऊन तयार करता येत नाही. ती एक लांब पल्ल्याची आणि गुंतागुंतीची प्रक्रिया असते. वेगवेगळया टप्प्यांतून जावे लागते. हे टप्पे काही वेळा नैसर्गिकरित्या जन्माला येतात. उदा. बलुते बंद झाल्यावर आणि जगायचे कसे? जगण्याचे पर्यायी साधन कोणते? असे प्रश्न तयार होतात. अशा अनेक संभाव्य प्रश्नांचा महाराजांनी अगोदरच विचार केलेला असायचा. त्यांची आखणी तयार असायची. धक्कातंत्राचा अवलंबन न करता; शिक्षण, प्रबोधन, कायदा, विचार आदी आयुधे वापरत ते सामाजिक न्यायाकडे जात होते. नुसता अन्न, वस्त्र, निवारा हा त्यांचा कार्यक्रम नव्हता, तर समाजजीवनात जेवढी म्हणून प्रतिष्ठेची क्षेत्रे असतील,तेथे अस्पृश्यांना ते संधी देत होते. विशेष म्हणजे या संधीकडे जाण्यासाठी जी

आवश्यक पात्रता मिळवावी लागते, ती अस्पृश्यांनाही मिळावी यासाठी महाराजांचे समांतर प्रयत्न चालू होते. केवळ भूतदयेपोटी, केवळ उदारमतवादी होऊन आपल्याला नेमले गेले आहे, अशी भावना त्यांनी अस्पृश्यांमध्ये निर्माण होऊ दिली नाही. नोकऱ्यात महत्त्वाच्या जागी जाणे हा त्यांचा हक्कच आहे आणि तो मिळवून कर्तबगारी सिध्द करण्याची क्षमता त्यांच्यात आहे, हेही महाराज वरच्या समाजाला सांगू पाहात होते. पोलीस गेटवर सोळा अस्पृश्यांची त्यांनी केलेली नेमणूक असेल, नगरपालिकेत एक विषय समितीच्या चेअरमनपदी अस्पृश्यांची केलेली नेमणूक असेल या सर्वांमागे अस्पृश्यांना समानता, प्रतिष्ठा, आत्मसन्मान आणि अर्थातच सामाजिक न्याय मिळावा, अशी भावना होती. या भावनेतून कधी कायदा, कधी नियम, कधी जाहीरनामा तर कधी अस्पृश्यांना छळणाऱ्यांना थेट शिक्षा असा हा मार्ग सुरु होता.

सामाजिक न्यायाकडे जाण्याचे महाराजांचे टप्पेही मोठे विलक्षण होते. गंगाराम कांबळे या त्यांच्या सेवकाच्या उदाहरणावरुन ही गोष्ट आणखी स्पष्ट करता येऊ शकते. गंगाराम हा पागेतील मोतद्दार होता. एकदा त्याने मराठयांसाठी असलेला हौद शिवला. अर्थातच, तेव्हाच्या रुढीनुसार तो बाटला. मराठा सेवकांनी गंगारामला त्याची पाठ फुटेपर्यंत, तो रक्तबंबाळ होईपर्यंत मारले. दौऱ्याहून परतल्यावर महाराजांना ही बातमी समजली. महाराजांनी गंगाराम आणि आरोपींना हजर व्हायला सांगितले. ज्या चाबकाने गंगारामची पाठ फोडली होती, त्याच चाबकाने महाराजांनी आरोपींची पाठ फोडली. आरोपी महाराजांच्या जातीचे म्हणजे मराठा होते. न्याय देताना महाराजांनी जात आडवी येऊ दिली नाही. गंगारामची सेवाही माफ केली आणि नव्या व्यवसायासाठी त्याला प्रोत्साहन दिले.गंगाराम कांबळेला नोकरी सोडून महाराजांनी स्वतंत्र व्यवसाय करायला सांगितला. त्यासाठी अस्पृश्यांना नसलेले व्यवसाय स्वातंत्र्य सर्वप्रथम त्यांनी दिले. गंगारामला आवडेल असा धंदा करायचा होता आणि त्यासाठी परवानगी देऊन महाराजांनी सामाजिक न्यायाला प्रारंभ केला. पण धंद्यासाठी जी जागा लागते, ती महाराजांनी सवर्णांच्या वस्तीत आताच्या टाऊन हॉलसमोर दिली. हॉटेल उभे करायला सामग्री लागते, तीही महाराजांनी त्याला दिली. पदार्थ तयार करण्यासाठी भांडीकुंडी आणि अन्नधान्यादी साहित्य दिले. हॉटेलसाठी बाकडी पुरवली.पहिला प्रश्न होता तो असा की, महाराच्या हॉटेलात कोण जाणार आणि त्याच्या हातचे पदार्थ कोण खाणार? सामाजिक न्यायाने झपाटलेल्या महाराजांनी हे प्रश्न स्वत:च सोडवले. ते स्वत: आणि दरबारातील काही उच्च जातीचे अधिकारी या हॉटेलचे ग्राहक बनले. (पवार जयसिंगराव, (२०१९): १३७८, १३७९) गंगारामला धीर देण्यासाठी, त्याला प्रतिष्ठित बनवण्यासाठी स्वत: उभे होते. सामाजिक न्यायाचे स्वप्न पाहात उभे होते. सार्वजनिक जीवनात त्यांनी जातिभेदाच्या विरुध्द, अस्पृश्यतेच्या विरुध्द सर्वशक्तीनिशी जाहीररित्या प्रयत्न करुन त्यांना संपवण्याचा घाट घातला. त्यांनी अस्पृश्यांना मंदिर—प्रवेशाचा हक्क दिला. विविध नोकऱ्यांमध्ये त्यांची भरती करुन स्पृश्यास्पृश्य विचार बाजूला सारला. त्यांनी एका दलिताला कोल्हापूर नगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष केले. सर्व अस्पृश्यांना पाणवठे, शाळा आणि विश्रामगृहे खुली करुन दिली. सामाजिक समता प्रत्यक्ष व्यवहारात साधण्याचा महाराजांचा हा प्रयत्न महाराष्ट्राच्या इतिहासातला सर्वात महत्त्वाचा प्रयत्न म्हटला पाहिजे. (पवार जयसिंगराव, (२०१९):३४८,३४९)

गुणवत्ता धारण केल्याशिवाय ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांशी स्पर्धा करता येणार नाही व खऱ्या अर्थी समतेची लढाई यशस्वी होणार नाही, याची शाहूंना जाणीव होती. त्यासाठी त्यांनी ब्राह्मणेतरांना शिक्षण देण्याचा कार्यक्रम आखला. त्यासाठी शाळा व मोफत वसतिगृहांची योजना आखली. त्यासाठी त्यांनी जातिनिहाय वसतिगृहे उघडली. अस्पृश्यांसाठी वेगळया शाळा व वसतिगृहे उघडली. आज आक्षेप घेतला जातो की, जातिनिर्मूलन करणाऱ्या शाहूंनी जातिनिहाय वसतिगृहे का उघडली? या प्रश्नाचे उत्तर तत्त्वज्ञानात व तर्कशास्त्रात नव्हते, तर कठोर वास्तवात होते. आपल्या कारकीर्दीच्या आरंभाला शाहूंनी जातवार वसतिगृहे स्थापन केलेली नव्हती. १८९६ साली त्यांनी स्थापन केलेले पहिले वसतिगृह सर्व जातिजमातीकरीताच होते. कोणत्याही जातीच्या विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये म्हणून एका न्यायाधिशाची वसतिगृहाच्या प्रमुखपदी नियुक्ती केली होती. (पवार जयसिंगराव, (२०१९): १३१) ब्राह्मणासहित सर्व जातींची मुले आलेली पाहून शाहूंना आनंद वाटला. परंतु काही दिवसांनी विपरीत घडले. वसतिगृहातील उच्चवर्णीय ब्राह्मण विद्यार्थी इतरवर्णीय विद्यार्थ्यांना हीन लेखू लागले; त्यांचा विटाळ मानू लागले; वेगवेगळया पंक्तींची मागणी करु लागले. परिणामत: ही मानहानी नको म्हणून इतर जातींच्या विद्यार्थ्यांनी वसतिगृहे सोडले व १९०० साली वसतिगृहात फक्त ब्राह्मण विद्यार्थी उरले. तीव्र जातिभेद शिल्लक असेपर्यंत प्रगतीसाठी प्रत्येकाच्या वेगळया व्यवस्था हाच सामाजिक समतेकडे

पाहणारा व्यावहारिक मार्ग, अशी ही शाहूंची भूमिका होती. याच भूमिकेमुळे त्यांनी १९०१ नंतर जातिनिहाय स्वतंत्र वसतिगृहाचा प्रयोग सुरु केलेला आहे.

शाहू महाराजांची सूंपर्ण कारकीर्द सामाजिक न्यायाला वाहिलेली होती. कायद्यावर समाज उभा करता येतो, तसा तो शिस्तीवर आणि समृध्दीवरही उभा करता येतो; पण तो सामाजिक न्यायावर उभा करता येणे कठीण असते. त्यासाठी प्रथम जीवनाच्या विविध क्षेत्रात सामाजिक क्रांती घडवावी लागते. पण, तेवढीच घडवून प्रवास थांबवला की, सामाजिक न्याय जन्माला येत नाही. जगात क्रांत्या होतात; पण प्रत्येक क्रांतीतून सामाजिक न्याय जन्माला येईलच असे नाही किंवा आला आहे, असेही नाही. भारताला स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे झाली, तरी सामाजिक न्यायाचा दुष्काळच आहे. या सर्व पार्श्वभूमीवर महाराजांनी सामाजिक न्यायासाठी यशस्वी केलेल्या लढयांचा, कायद्यांचा आणि सुधारणांचा विचार केला पाहिजे. (पवार जयसिंगराव, (२०१९):१३८२) राजर्षी शाहू यांचे जीवनकार्य म्हणजे सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी केलेला आमरण संघर्षच होता.

**सामाजिक न्यायाची अंमलबजावणी**

सामाजिक न्यायाच्या संकल्पनेत समतेबरोबर बंधूता हेही तत्व आहे. अस्पृश्यतेच्या रुढीत ते पायदळी तुडविले जात होते. तत्कालीन समाजातील अतिशुद्र लोकांना माणूस तर नाहीच; पण पशूपेक्षाही हीन समजले जात होते. त्यांचा स्पर्शसुद्धा अपवित्र समजला जात होता. या पार्श्वभूमीवर छत्रपती शाहूनी अस्पृश्यता निवारणाचे जाहीरनामे काढले, सर्व सरकारी खाती व सार्वजनिक ठिकाणे येथे अस्पृश्यता पाळण्यास कायद्याने गुन्हा ठरविला गेला. जाहीरनाम्यात त्यांनी अस्पृश्यांना 'प्रेमाने, 'समतेने' तसेच 'ममतेने व आदराने' वागविले पाहिजे, असा आपल्या अधिकाऱ्यांना आदेश दिला आहे.पण, केवळ असे आदेश देऊन महाराज थांबले नाहीत. यांनी त्यानुसार स्वत:चे आचरण ठेवले. अस्पृश्य समाजातील लोकांना त्यांनी राजवाड्यावर हुजरे, शरीरक्षक, कोचमन, ड्रायव्हर, माहूत अशा अनेक जागांवर नेमले. काहींना शिकारी खुतात पीलखान्यावर, पागेवर घेतले. जसजसे अस्पृश्य लोक शिकून तयार होऊ लागले, तसतसे त्यांना सरकारी नोकऱ्यात भाग कारकून, अव्वल कारकून, तलाठी, दफ्तरबंद म्हणून अग्रक्रमाने घेतले जाऊ लागले.

१६ ऑगस्ट १९१८ च्या एका हुकमात महाराजांनी म्हटले आहे,"हल्ली तलाठयांच्या नेमणुका चालल्या आहेत. त्यात अस्पृश्य जातीच्या लोकांस प्राधाण्य देण्यात यावे. तसेच त्या जातीतील लोकांस योग्यता व लायकी असल्यास दरबारातील कोणत्याही योग्यतेच्या जागेवर म्हणजे रेव्हिन्यू, ज्युडिशयल, पोलीस, जनरल आदी कोणत्याही मुख्याच्या जागेवरही नेमण्यात येईल. इत:पर त्यांच्या अस्पृश्यत्वाची सबब सरकारी नोकरीच्या बाबतीत घेतली जाणार नाही, म्हणून जाहीर करण्यात यावे. "अस्पृश्य उमेदवारास प्राधाण्य द्यावे, म्हणजे केवळ ब्राह्मणच नव्हे, तर मराठा उमेदवार जरी उपलब्ध असेल, तरी प्राधाण्य द्यावे, असा या हुकमाचा अर्थ आहे. सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी समाजाच्या सर्व क्षेत्रात विकासाच्या ज्या संधी उपलब्ध होतात, त्यांचे वितरण दुर्बल घटकांना प्राधाण्याने झाले पाहिजे; आणि ही जबाबदारी मुख्यत्वेकरुन शासनसंस्थेची आहे, हे महाराजांच्या कृतीतून स्पष्ट दिसते. महार, मांग आदी तथाकथित अस्पृश्य मंडळींना शाळा, पाणवठे, तलाव, सरकारी कचेऱ्या, दवाखाने, राजवाडयातील जेवणाच्या पंगती सररास खुल्या राहतील, अशी दक्षता महाराज जातीने घेत असत. अस्पृश्यता—निवारण्याच्या बाबतीत जे सरकारी अधिकारी काटेकोर रीतीने कायद्याने पालन करणार नाहीत, अशा अधिकाऱ्यांना सरळ घरीच जावे लागेल अशी जरब त्यांनी बसविली होती. महाराज स्वत:च जाहीर रीतीने महारमांगांच्या हातचे अन्न खात असत. इतरांनी त्याचे अनुकरण करावे, हा त्यांचा हेतू असे. (पवार जयसिंगराव, (२०१९): १२४६,१२४७)

संस्थानातील अनेक गावांच्या महार समाजांनी सामुदायिकरित्या आपली 'महार वतने' खालसा करावीत म्हणून दरबारकडे अर्ज केले. असाच हा एक महारांचा विनंती अर्ज. या कागदात 'महार' वतनासंबंधी महाराजांचे अन्यत्र प्रसिध्द झालेले विचारच प्रतिबिंबित झालेले आहेत. (पवार जे. के., (२०१८): २२७)१९१८ साली महाराजांनी महारांची बलुते पध्दत बंद करुन त्यांच्या जमिनी त्यांच्या नावावर रयतवारीने करु दिल्या आणि कोल्हापूर संस्थानातील महारांची महारवतनाच्या गुलामगिरीतून मुक्तता केली. महारमांगादी अस्पृश्यांना दिलेल्या मानवी हक्कांच्या विरुध्द जे दंगेधोपे करतील, त्यांना कडक शासन होईल असे फर्मान काढले. पुढे दरबारने कुलकर्णीवतने नष्ट केल्यावर महारातील नि इतर अस्पृश्यवर्गातील तरुणांना महाराजांनी तलाठी नेमले. दत्तोबा पोवारांची कोल्हापूर नगरपालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक केली. (कीर धंनजय, (१९७०): १७)

अस्पृश्यता निर्मूलनाच्या प्रश्नासंबंधी बोलताना १५ एप्रिल १९२० रोजी माणगांव येथील परिषदेत महाराज म्हणाले की, अस्पृश्यांना तुम्ही बेशरम नि बेअब्रू केल्यामुळे त्यांची वृत्ती गुन्हयाकडे होते. ''कित्येक लोक म्हणतात राजकारणाचा नि अस्पृश्यतेचा काय सबंध आहे? पण मी म्हणतो, अस्पृश्यांना मनुष्याप्रमाणे वागविल्याशिवाय राजकारण कसे होणार? ज्यांना राजकारण करणे आहे त्यांनी मनुष्याला मनुष्याप्रमाणे म्हणजे इतर देशांत वागवितात त्याप्रमाणे वागविले पाहिजे. आणि तसे वागविल्याशिवाय देशकार्य कसे होणार? तोंडाने बडबडणारे पुढारी आम्हास नको आहेत. कृतीने जातिभेद मोडून आम्हास मनुष्यप्रमाणे वागवतील असे पाहिजेत.''अस्पृश्यांना आपल्या स्वत्वाची जाणीव करुन देऊन स्वावलंबी होण्याचा संदेश शाहू छत्रपतींनी दिला व त्यासाठी लागणारी साधनसामग्रीही त्यांनी पुरवली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रुपाने नेमका त्याचवेळी त्यांना अभिप्रेत असलेला बहिष्कृत समाजातील तरुण पुढे आला. मागास जातींमधील उच्चशिक्षित व बुध्दिमान तरुण म्हणून बाबासाहेबांची ख्याती तेव्हा सर्वत्र पोहोचली होती. अस्पृश्यांचे पुढारीपण त्यांचे त्यांनीच करायला हवे, हे आपले मत छत्रपतींनी  बाबासाहेबांचे एक सहकारी सीताराम शिवतरकर यांना सप्टेंबर १९१९ मध्ये कळवले होते. हा नेता त्यांना आंबेडकरांमध्ये दिसला. बाबासाहेबांना भेटायला छत्रपती स्वत: परळ येथील चाळीत गेले. दोघांची चर्चा झाली. छत्रपतींनी आंबेडकरांना कोल्हापूरला यायचे निमंत्रण दिले. ठरल्याप्रमाणे ते कोल्हापुरी आले, तेव्हा छत्रपतींनी त्यांचे भव्य स्वागत केले. मिरवणूक काढली, त्यांना मराठेशाहीचे प्रतीक असलेला जरीपटक्याचा आहेर केला. हा काळ माँटेग्यू–चेम्सफर्ड समितीपुढील साक्षीपुराव्यांचा होता. अस्पृश्यांची बाजू नीट मांडली जाण्यासाठी स्वतंत्र वृत्तपत्रांची गरज होती. छत्रपतींच्या सहकार्याने व मदतीने अनेक ब्राह्मणेतर पत्रे चालत होती. आता बाबासाहेबांच्या नव्या पत्राची त्यात भर पडली.बाबासाहेंबाच्या 'मूकनायक' पत्राचा पहिला अंक ३१ जानेवारी १९२० रोजी प्रसिध्द झाला. (मोरे सदानंद, (२००७):४४३)

लंडन येथील अपुऱ्या राहिलेल्या उच्च शिक्षणासाठी शाहू महाराज यांनी बाबासाहेबांना आर्थिक मदत केली. बाबासाहेबांना स्वत:च्या बरोबरीने रथातून कोल्हापूर संस्थानात फिरविले. आणि माणगाव परिषदेत तर बुहजन समाजात नेता म्हणून जाहीर केले. या सर्व बाबी बाबासाहेब आंबकडेकर या नवतरूणास इथल्या कोटयावधी वंचित बहुजन समाजाचा नेता म्हणून बाबासाहेबांना प्रस्थापित करणेसाठीच शाहू महाराज जाणिवपूर्वक करीत होते. कारण शाहू महाराजांना विश्वास होता की, बाबासाहेब या देशातील दीन, दलित, वंचित गरीब समाजाचा उध्दार करतील. माणगाव परिषदेत महाराजांनी अस्पृश्य समाजाला सांगितले की, ''तुमचे खरे पुढारी डॉ. आंबेडकर आहेत. माझी खात्री आहे की ते तुमचा उध्दार केल्याशिवाय राहाणार नाहीत. इतकेच नव्हे तर ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील अशी माझी मनोदेवता मला सांगत आहे. (कीर धनंजय, (१९७०):३१) या परिषदेमध्ये भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याकडे बोट दाखवून त्यांनी, 'येथून पुढे हाच तुमचा पुढारी' असा गौरवपूर्ण उल्लेख केला आणि त्यांच्या नेतृत्वाखाली हरिजनांनी आपल्या मुक्ततेसाठी आणि सामाजिक व आर्थिक न्यायाच्या प्रतिष्ठापनेसाठी आपले आंदोलन चालू ठेवावे असा सल्ला दिला. डॉ. आंबेडकरांच्या रुपाने अस्पृश्यांचे खास स्वतंत्र नेतृत्व उदयास येत आहे, हे पाहून महाराजांना अतिशय आनंद झाला. 'स्वत:च्या बुध्दिमान व कर्तबगार नेत्याचे अनुयायी बनून आपली चळवळ खंबीरपणे पुढे न्या,' असाच अस्पृश्य परिषदेच्या अध्यक्षपदावरुन त्यांनी आपल्या अस्पृश्य बांधवांना सल्ला दिला आहे. (पवार जयसिंगराव, (२०१९): १२६६, १२६७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर या शाहू महाराजांनी प्रस्थापित केलेल्या नेतृत्वाने कोटयावधी बहूजनांचे जीवन प्रकाशमय केले.

छत्रपतींच्या विचारात, आचरणात, कृतीत नि प्रचारात दलितोध्दाराचा कळवळा म. फुले यांच्या इतकाच जवळीत होता. त्यांची अस्पृश्योध्दाराची तळमळ नि कार्य पाहून ''निस्वार्थ मिशनरी भावनेचे अद्वितीय उदाहरण,'' असा छत्रपतींचा गौरव महात्मा गांधींनी केला होता, तो यर्थाथ होता. (कीर धंनजय, (१९७०):८४) सामाजिक क्षेत्रामधील सुधारणा, समाजात एकात्मता असावी, न्यायासनासमोर सर्वजण सारखेच समजले जावेत. सर्वांना सारखा सामाजिक न्याय मिळावा. वरिष्ठ, कनिष्ठ वर्गातले भेद नाहीसे व्हावे म्हणून बजावलेली भूमिका आदी कारणामुळे महाराष्ट्र शासनातर्फे शाहू महाराजांचा जन्मदिवस "२६ जून" हा सामाजिक न्याय दिवस म्हणून साजरा केला जातो.

**शिक्षण : सामाजिक न्यायाचे साधन**

शिक्षण हे तर सामाजिक न्याय प्राप्त करण्यासाठीचेएक मोठे साधन आहे याची महाराजांना जाणीव होती. शिकल्याने माणूस ज्ञानी होता, विचार करतो, प्रश्न विचारतो आणि आपल्या रयतेने, जनतेने तर हेच केले पाहिजे, अशी महाराजांची धारणा होती. सर्वप्रथम त्यांनी सर्व जातींसाठी

शिक्षणाचा कायदा केला. शिक्षण मोफत झाले म्हणून काही होत नाही तर त्यासाठी शाळा काढाव्या लागतात. शाळांवर तिजोरीतला पैसा ओतावा लागतो. शाळा निघाल्या पण पोरे कोठून आणायची? मग पालकांनी पोरे शाळेत पाठवावी म्हणून त्यांचे प्रबोधन. पोरे तयार झाली; पण त्यांना शहरात ठेवायचे कुठे? मग होस्टेल आली. एकाच होस्टेलमध्ये वेगवेगळया जातीची पोरे त्या काळात एकत्र राहायला तयार झाली नाहीत. मग त्यातून मार्ग निघाला. जातवार होस्टेल. एवढे करुनही भागले नाही. पोरांनी खर्च कोठून करायचा? मग वह्या, पुस्तके मोफत. मग चांगले शिक्षण मिळावे यासाठी शिक्षकांचे प्रबोधन. मग शिकवायचे काय? पारंपारिक कर्मठ विषयांचा अभ्यास बदलून, त्या ठिकाणी नवा अभ्यासक्रम आणला. विज्ञान, तंत्रज्ञान, मूल्य, संस्कार आणि छ. शिवाजी महाराजांच्या इतिहासाला सामोरे जाणारा अभ्यास आणला.

एवढे करुनही पोरे शाळेत आली नाहीत, तर मग शिक्षण सक्तीचे करायचे. गरीब पोरांच्या भोजनाची व्यवस्था करायची. शिष्यवृत्त्या सुरु करायच्या. बक्षिसे सुरु करायची. शिक्षण सक्तीचे होऊनही पोरे शाळेत आली नाहीत तर? तर मग सक्तीची अंमलबजावणी करायची. पालकांवर कारवाई करायची. त्यांना दंड करायचा. मुलगा गैरहजर राहणार असेल, तर योग्य कारणे देऊन पूर्वपरवानगी घ्यायची. पोरे शिकली आणि मोठी झाली, तर पुढे काय करायचे? मग त्यांच्यासाठी नोकऱ्या तयार करायच्या. तयार केलेल्या नोकऱ्या त्यांना कशा मिळणार? मग राखीव जागा निर्माण करायच्या. ज्या ज्या पोरांकडे जी पात्रता असेल, ती पाहून नोकऱ्या द्यायच्या. नोकरदार पोरांना मग सामाजिक कार्यांकडे वळवायचे. समाज बदलण्याच्या कामी त्यांची मदत घ्यायची. शिक्षण हे अशा प्रकारे आत्मसन्मान आणि समाजोध्दार यांच्याशी बांधले गेले होते. मागास समाजानेही या कार्यात पुढे यावे म्हणून शाळा, संस्था काढण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. शाळा खासगी असल्या तरी महाराजांनी केलेले नियम शाळांनी पाळायचे होते. जो नियम पोरांच्या शिक्षणासाठी,तोच पोरींच्या शिक्षणासाठी. ज्यांना दिवसा शिक्षण घेणे जमणार नव्हते, त्यांच्यासाठी रात्रशाळा काढण्यात आल्या. जातिव्यवस्थेमुळे सडलेल्या जगातून स्वातंत्र्याचे, सन्मानाचे वारे वाहात असलेल्या जगात येण्याचा मार्ग म्हणजे शिक्षण होय. ते केवळ साक्षरतेशी जोडलेले नव्हते. माणसाच्या समग्र विकासाशी जोडले गेलेले होते. सामाजिक न्यायाशी जोडले गेले होते.

प्रत्येक मागासलेल्या जातीसाठी कोल्हापूरात विद्यार्थी वसतिगृह स्थापन करण्याचे कार्य किंवा राज्यातील मुलांना सक्तीचे मोफत शिक्षण देण्याचे कार्य याकडे आपण या दृष्टीने पाहिले तर आपल्या सामाजिक न्यायाच्या धोरणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी ते कशी करत होते, हे ध्यानात येते. त्या काळात प्रत्येक जात आपल्याच रिंगणात फिरत असल्याने सर्व जातींच्या विद्यार्थ्यांसाठी एकच वसतिगृह ही कल्पना कितीही आदर्श असली, तरी व्यवहार्य नव्हती. प्रत्येक जातीसाठी वेगळे वसतिगृह ही महाराजांची अंतिम उद्दिष्ट साध्य करण्याच्या मार्गातील एक तडजोड होती. जातिभेदाचा अंत हे उद्दिष्ट गाठायचे असेल, तर लोक शहाणे व्हायला पाहिजेत; त्यासाठी शिक्षणाचा प्रसार व्हायला हवा आणि त्यासाठी शिक्षणाच्या विविध सुविधा निर्माण करावयास हव्यात, अशा त्या मार्गातील पायऱ्या होत्या आणि त्या चुकीच्या नव्हत्या. शासनसंस्थेने केवळ सामाजिक न्यायाची धोरणे घोषित करुन समता प्रस्थापित होत नसते. त्यासाठी शासनसंस्थेच्या चालकांजवळ ती धोरणे राबवण्याची व त्यासाठी पूरक व पोषक अशी परिस्थिती निर्माण करण्याची इच्छाशक्ती असणे गरजेचे असते. शाहू छत्रपतीजवळ अशी जबरदस्त इच्छाशक्ती होती. (पवार जयसिंगराव, (२०१९):१५१६)

**सारांश**

जनतेला चैतन्य व नवजीवन देणारा राजा म्हणून १८९४ ते १९२२ ही २८ वर्षांची त्यांची कारकीर्द इतिहासातील एक सुवर्ण कालखंड होता, असे वर्णन करावे लागेल. सत्तेवर आले, तेव्हा कोल्हापूर संस्थान त्यांना 'हताश' आणि 'असहाय' आढळले. पण, त्यांनी जगाचा निरोप घेतला, तेव्हा त्यांनी कोल्हापूर संस्थानाला 'आशादायी' आणि 'प्रगतशील' बनवले होते. शाहू महाराजांना चुकीच्या पध्दतीने सादर करणे किंवा जातीयवादी ढगाखाली त्यांच्या स्मृतीस काळे फासण्याचा प्रयत्न करणे, अशा गोष्टींनी त्यांना विस्मरणात टाकणे शक्य होणार नाही. ते मानवजातीचे अजरामर हितकर्ते होते. कारण त्यांना सत्याचे यथार्थ ज्ञान झाले होते आणि त्यानुसार ते वागले. ते जनसामान्यांचे नेते होते. वंचिताचे वाली होते. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायाबाबत त्यांची कामगिरी सर्वांचे डोळे उघडणारे होती.

डॉ. आंबेडकराच्या शब्दांत सांगायचे, तर शाहू महाराज अशा सर्वांचे मूकनायक होते. त्यांचे मन तीक्ष्ण आणि भेदक होते. दंतकथा, काल्पनिक कथा यातून मार्ग काढत आणि असत्यातून सत्याचा

शोध घेत, त्यांनी प्रवास केला. प्रारब्धाने त्यांना अधिक आयुष्य दिले नाही, तरीही ते या जीवनकाळात कोल्हापूर आणि महाराष्ट्राचे जननायक बनले. अद्यापही ते देशातील कामगार आणि शेतकऱ्यांच्या हृदयात विराजमान झालेले आहेत. ते एक प्रभावशाली नेते होते. आजसुध्दा कोल्हापूरातील प्रत्येक स्त्रीपुरुषांकडून त्यांची स्मृती आदरपूर्वक जनत केली जाते.

"इतिहासात राजाच्या खांद्यावर समाजक्रांतीचा झेंडा क्वचितच दिसतो. समाजसुधारक राजे अनेक होऊन गेले; पण समाजक्रांतिकारक राजे शोधूनही सापडणे कठीण. असा दुर्मीळ राजा होण्याइतके कार्य शाहू महाराजांकडून घडले", असे न्या. पी. बी. सावंत यांनी म्हटले आहे. अनेक युगे निपचित पडलेल्या आणि इथल्या विषम संस्कृतीचे विष पचवत कोमात गेलेल्या समाजात जागृती करणारा, विषमतेची विषवल्ली फेकून समाजक्रांतीची बीजे पेरणारा, त्यांना लढायांचे खतपाणी घालणारा, त्या वाढवणारा आणि समाजक्रांतीच्या जयघोषात सामाजिक न्यायाचे स्वप्न पाहणारा राजा दुर्मिळच म्हणावा लागेल.

राजर्षी शाहू केवळ ब्राम्हणेतरांचे पुढारी होते, असे म्हणणे बरोबर ठरणार नाही. जातिपातीचा विचार न करता, भारतीयात एकतेचे आणि शक्तीचे प्रवर्तन करणारे आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्वांना उचलून धरुन सार्वजनिक न्यायाचे प्रवर्तन करणाऱ्या पुरोगामी लोकांचे ते पुढारी होते.

**संदर्भसूची**

१. जाधव रमेश, (२०१६), 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ', महाराष्ट्र शासन चरित्र साधने प्रकाशन समिती मंत्रालय, मुंबई.
२. कीर धंनजय, (१९७०), श्री शाहू स्मारक व्याख्यानमाला, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,
३. मोरे सदानंद, (२००७), 'लोकमान्य ते महात्मा', खंड पहिला, राजहंस प्रकाशन, पुणे,
४. पवार जयसिंगराव, (२०१९),'राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारकग्रंथ', खंड: एक, दोन आणि तीन, अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर.
५. पवार जयसिंगराव, (संपा), (२०१९),'राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथ', खंड: चार आणि पाच, अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर.
६. पवार जे. के., (२०१८), 'राजर्षी शाहूंची अर्थनीती', राज प्रकाशन, कोल्हापूर,
७. पाटील, थोरात, पवार, (२०१५), 'महाराष्ट्रातील समाज सुधारक', फडके प्रकाशन, कोल्हापूर